# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

**YEAR : 44)** **15th May 2019 ( No. of Pages 12 )** **( No : 07**

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

## *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २१ एप्रिल २०१९ रोजीच्या बैठकीत संमत करण्यात आलेला ठराव*

**१.** विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेल्या व केंद्र शासनाने मान्य केलेल्या सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने दिनांक ५ मार्च २०१९ रोजी घेतला. त्याच दिवशी मा.मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील जनसंपर्क कक्षाने एक अधिकृत प्रसिद्धी पत्रक काढून हा निर्णय जाहीर केला. या प्रसिद्धीपत्रकातून अधिकृतपणे पुढील माहिती देण्यात आलेली आहे :-

"उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्यातील अकृषि विद्यापीठे, विधि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये, शासकीय महाविद्यालये, विज्ञान संस्था, अनुदानित अभिमत विद्यापीठे (पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठामधील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुधारित शैक्षणिक पात्रता अर्हता लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे."

त्यानंतर पुढे याच प्रसिद्धीपत्रकातून अधिकृतपणे पुढील माहिती देण्यात आलेली आहे :-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**"

**२.** दिनांक २ नोव्हेंबर २०१७ रोजी केंद्राच्या मानव संसाधन विभागाने पत्र पाठवून या कामी (परिच्छेद 16 (iv)(a) अन्वये) देऊ केलेली १२०० ते १३०० कोटी रुपयांची मदत स्वीकारण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. हे निश्चितच स्वागतार्ह होय. मात्र हे करीत असतांना याच परिच्छेद १६ मधील एक अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती राज्याच्या मंत्रिमंडळापासून लपवून ठेवण्यात आली, असे स्पष्टपणे दिसून येते. २ नोव्हेंबर २०१७ च्या केंद्र शासनाच्या याच पत्राच्या परिच्छेद १६ च्या उपपरिच्छेद (iv)(h) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे:-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition **that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification..."**

**३.** केंद्र शासनाच्या समग्र योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल न करता ती योजना जशीच्या तशी अंमलात आणावी लागेल. केंद्राच्यापेक्षा जास्त वेतनश्रेण्या राज्यांना द्यायच्या असतील तर त्यांना त्या देता येतील, याशिवाय केंद्राच्या या योजनेमध्ये कोणताही बदल करता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद केंद्राच्या या पत्रामध्ये आहे. राज्य शासनाच्या **उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ८ मार्च २०१९ रोजी या विषयावर काढलेल्या शासननिर्णयाचे अवलोकन केले** असता असे स्पष्टपणे दिसून येते की, केंद्र शासनाच्या योजनेमध्ये लहान-सहान किंवा किरकोळ बदल नव्हे तर अनेक मोठमोठी भगदाडे पाडणारे आक्रमक बदल करून राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने राज्याच्या मंत्रिमंडळाची तसेच महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राची फसवणूक केलेली आहे. **अशी फसवणूक करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत ते निश्चित करण्यात यावे व याबद्दल त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

---

### *जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय)*

### *मंत्रिमंडळ निर्णय*

दिनांक : ५ मार्च २०१९

**(बैठक क्र. २१५)**

**(३) राज्यातील प्राध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

उच्च शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या विविध शिक्षण संस्थांमधील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुधारित शैक्षणिक अर्हता लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्यातील अकृषि विद्यापीठे, विधि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये, शासकीय महाविद्यालये, विज्ञान संस्था, अनुदानित अभिमत विद्यापीठे (पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठामधील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुधारित शैक्षणिक पात्रता अर्हता लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**

* * * * *

***तळटीप :-*** *कार्यकारी मंडळाच्या बैठकीच्या दिवशी २१ एप्रिल २०१९ रोजी अधिकृत संकेतस्थळावरून उपरोक्त मजकूर घेतला आहे. याची प्रत सर्वांनी मूळ संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावी. दिनांक ५ मार्च २०१९ रोजी अधिकृत संकेत स्थळावरून जो मजकूर प्रसारित करण्यात आला होता तो यापूर्वी १५ मार्च २०१९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २५ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.* ***- संपादक, 'नुटा बुलेटीन'***

---

## आंदोलन विशेषांक

४. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या ८ मार्च २०१९ रोजीच्या शासननिर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे स्पष्टपणे दिसून येते की, भारताच्या घटनेतील तरतुदींचा भंग करण्याचा अपराधसुद्धा असा शासननिर्णय निर्गमित करणाऱ्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या हातून घडलेला आहे. याबाबतीत घटनात्मक व कायदेशीर तरतुदी काय आहेत याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. भारतीय संविधान अस्तित्वात आले त्या दिवसापासून **"Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions."** हा विषय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील केंद्रसूचीमध्ये समाविष्ट आहे. (Entry 66 in the Union List i.e. List I of Seventh Schedule of the Constitution of India.) देशभर उच्च शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे व देशभरातील या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थामध्ये समन्वय राखणे हे काम संपूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते. केंद्रसूचित असलेल्या विषयाबाबत अधिकार क्षेत्र हे केंद्र शासनाला व संसदेलाच असेल अशी घटनेच्या कलम २४६ मध्ये तरतूद आहे. ती पुढीलप्रमाणेः- **"246.** ..... Parliament has exclusive power to make laws with respect to any of the matters enumerated in List I in the Seventh Schedule (in this Constitution referred to as the "Union List")"

५. घटनेने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून केंद्राने "विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६" हा कायदा पारित केला. या कायद्याच्या २६ व्या कलमान्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत. हे रेग्युलेशन्स भारतातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन व्यवस्थेवर बंधनकारक आहेत. आता विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १८ जुलै २०१८ रोजी "UGC Regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in Universities and Colleges and other measures for the maintenance of standards in Higher Education, 2018" हे रेग्युलेशन्स भारत शासन राजपत्रात प्रख्यापीत केलेले आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची भरती व पात्रता, थेट भरती व बढतीने भरती, निवड समितीची रचना, आश्वासित प्रगती योजनेबाबतचे तपशील, रजेबाबतच्या तरतुदी, संशोधन उत्तेजनार्थ द्यावयाचे अनुदान, प्रोबेशनचा कालखंड व कन्फर्मेशनच्या तरतुदी, कामाचे तास, कार्यभाराचे तपशील, सेवा ज्येष्ठता ठरविणे व सेवेचा करारनामा व वेतनश्रेण्या इत्यादी बाबींचे तपशील या रेग्युलेशन्सनी ठरवून दिलेले आहे.

६. सनदी अधिकाऱ्यांना राज्यकर्त्यांचे कान चोवीस तास उपलब्ध असतात त्यामुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत ते अत्यंत चुकीच्या गोष्टी भरवत राहतात व त्यांच्या पूर्वग्रहासह त्यांना पाहिजे तसे निर्णय कॅबिनेटमध्ये करवून घेतात. हे निर्णय अत्यंत चुकीचे असल्यामुळे ते पुढे झालेल्या फार मोठ्या आंदोलनानंतर बदलविले जातात. अशा उदाहरणांनी महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्राचा इतिहास खचाखच भरलेला आहे. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळी सनदी अधिकाऱ्यांनी किती

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेला ठराव**

# जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेल्या ठरावानुसार स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या जिल्ह्यातील शिक्षकांचा मेळावा स्तंभ तीनमध्ये दर्शविलेल्या दिवशी व दिनांकाला, स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या वेळी व स्तंभ ५ मध्ये दर्शविलेल्या स्थळी होईल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. विलास ढोणे, सचिव, नुटा**

**तक्ता**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | मेळाव्याचा दिवस व दिनांक | मेळाव्याची वेळ | मेळाव्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ |
| १. नागपूर | रविवार, ०९.०६.२०१९ | दुपारी ३.०० वा. | जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडी, नागपूर |
| २. अमरावती | सोमवार, १०.०६.२०१९ | दुपारी ४.०० वा. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती |
| ३. अकोला | मंगळवार, ११.०६.२०१९ | दुपारी ४.०० वा. | शिवाजी महाविद्यालय, अकोला. |
| ४. बुलढाणा | बुधवार, १२.०६.२०१९ | दुपारी ४.०० वा. | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा |
| ५. चंद्रपूर व गडचिरोली | बुधवार, १२.०६.२०१९ | दुपारी ३.०० वा. | एफ. ई. एस. कॉलेज, चंद्रपूर. |
| ६. गोंदिया | गुरूवार, १३.०६.२०१९ | सकाळी १०.०० वा. | डी.बी. सायन्स कॉलेज गोंदिया |
| ७. भंडारा | गुरूवार, १३.०६.२०१९ | दुपारी ३.३० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा |
| ८. वाशिम | गुरूवार, १३.०६.२०१९ | दुपारी ४.०० वा. | आर. ए. महाविद्यालय, वाशिम |
| ९. वर्धा | शुक्रवार, १४.०६.२०१९ | दुपारी ४.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| १०. यवतमाळ | शनिवार, १५.०६.२०१९ | दुपारी ४.०० वा. | अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ. |

**भारतीय घटनेतील तरतुदी, तद्नुसार करण्यात आलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यातील तरतुदी व त्या कायद्यांतर्गत तरतुदींचा वापर करून केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीने विद्यापीठ अनुदान आयोगाने 'भारत शासन राजपत्रा'मध्ये प्रख्यापित केलेले 'रेग्युलेशन्स' हे कस्पटासमान समजण्याच्या नोकरशाहीच्या वृत्तीची तीव्र निर्भत्सना करण्यात येत आहे.**

( महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २१ एप्रिल २०१९ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद १६ पहा. )

चुकीच्या भूमिका घेतल्या होत्या व त्या निरस्त करण्यात उच्च शिक्षण क्षेत्राची किती शक्ती खर्ची पडली होती हा आता तपशीलवार इतिहासाचा भाग झालेला आहे. सनदी अधिकाऱ्यांनी निर्माण केलेले अनेक अडथळे दूर करून राज्यशासनाने तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेली व केंद्र शासनाने मान्य केलेली वेतन व्यवस्था महाराष्ट्रात जशीच्या तशी अस्तित्वात आणलेली होती. याची आठवण करून देतांनाच **आजची घटनात्मक व कायदेशीर स्थिती लक्षात घेता त्या व्यवस्थेमध्ये घातपात करण्याचा सनदी अधिकाऱ्यांना कोणताही अधिकार नाही हेही नमूद करण्यात येत असून त्यात मोडतोड करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला सर्व शक्तिनिशी विरोध केला जाईल असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.**

### *तिसऱ्या वेतन आयोगाची अंमलबजावणी*

७.१ तिसऱ्या वेतन आयोगाच्या वेळी राज्याच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. **त्याप्रमाणे राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी निवेदन केले** त्यामध्ये नवीन वेतन श्रेणीबाबत असे नमूद होते की :- **"नवीन वेतनश्रेणी :- विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी जशाच्या तशा शासनाने स्वीकारलेल्या आहेत."** *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन, खंड ४३, क्रमांक २८, पृष्ठ ३६-३८)*

७.२ अंतिमतः त्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा महाराष्ट्रात लागू करण्यात आल्या, मात्र तसे होण्यापूर्वी जो 'रक्तपात' झाला तो लक्षात घेणे आवश्यक आहे. जून १९७५ मध्ये आणिबाणी घोषित करण्यात आली, याचा फायदा घेऊन सचिवांनी वेगळाच प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवला. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा शासन निर्णय (क्रमांक USG-११७४/१०४२८७) हा दिनांक ४ आक्टोबर १९७५ रोजी निर्गमित झाला. **"These qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereafter."** अशा प्रकारची उलटी शब्द रचना या शासननिर्णयामध्ये टाकण्यात आली. इतर अनेक बाबतीत विपरित बदल करण्यात आलेले होते. शब्द फिरविण्याच्या शासनाच्या या भूमिकेमुळे उच्च शिक्षण क्षेत्राला कमालीचा धक्का बसला, कुलगुरू हादरून गेले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याचा धिक्कार केला. धिक्काराच्या एका जाहीर सभेनंतर **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व सरचिटणिस यांना १ नोव्हेंबर १९७५ रोजी 'मिसा'खाली अटक करून १५ महिने स्थानबद्धतेत ठेवण्यात आले.**

७.३ पुढे अनेक लहानमोठी आंदोलने झाली. आणिबाणी संपली. मंत्रिमंडळ बदलले. आंदोलने सुरूच राहीलीत. तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी महासंघाला चर्चेसाठी बोलाविले व पूर्वीच्या अनेक चुका दुरुस्त करण्याचे मान्य केले. महाराष्ट्र राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी जी चर्चा झाली त्यामध्ये याबाबतचे तपशीलवार व बारीक-सारीक निर्णय झाले. दिनांक ८ जुलै १९७७ रोजी झालेल्या या बैठकीचे अध्यक्ष खुद्द मा.मुख्यमंत्री होते. मा.शिक्षणमंत्री व शिक्षण राज्यमंत्री सुद्धा या बैठकीला हजर होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने संघटनेचे कार्यकारी मंडळ या चर्चेमध्ये सहभागी झाले होते. सहाही विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठाचे कुलगुरू या बैठकीला उपस्थित होते. **एकूण ३ मतैक्यपत्रे तयार झालीत. तीनही मतैक्यपत्राच्या आधारे एकत्रित समझोतापत्रक (टर्मस् ऑफ सेटलमेंट) तयार करून दिनांक २२.९.१९७७ रोजी हा समझोता कार्यभाराच्या तपशीलासह मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आला.** उपरोक्त समझोता पत्राच्या आधारावर २५ ऑक्टोबर १९७७ रोजी शासन आदेश क्रमांक यु.एस.जी.११७७/१२९३८७/३२ सेल हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

७.४ ४ ऑक्टोबर १९७५ च्या आणिबाणी काळातील शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती :- "These qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereinafter." उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले :- "The qualifications mentioned in (a)/(b) above are applicable to lecturers/teachers who may be recruited hereafter i.e. on or after the date of this revised Government Resolution." ठरल्याप्रमाणे नवीन शासननिर्णय हा दिनांक २५ ऑक्टोबर १९७७ रोजी निर्गमित झाला व तेथेच हा तिसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात लागू करण्याचा व त्यासाठी कराव्या लागलेल्या आंदोलनाचा विषय संपला. **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात जशाच्या तशा लागू झाल्या.**

### *चौथ्या वेतन आयोगाची अंमलबजावणी*

८.१ साधारणपणे लिहिता, वाचता येणाऱ्या व्यक्तिंनाच मंत्रालयामध्ये अधिकारी म्हणून भरती केले जाते, असे आपण समजतो व ते तसे खरेही असते. पण त्यातील एखाद्या अधिकाऱ्याला एखादे वाक्य नीट वाचता आले नाही किंवा त्याचा अर्थ त्याला नीट कळला नाही तर त्यातून त्याने काढलेल्या पोरकट अर्थामुळे साऱ्या महाराष्ट्रातील उच्च शिक्षणक्षेत्र कसे पेटविले जाते याचा एक उत्तम नमूना सन १९८८ मध्ये साऱ्या महाराष्ट्राला पहायला मिळाला. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे दर आठवड्याला कामाचे एकूण तास किती असावे? याबाबतच्या संपूर्ण अज्ञानावर आधारित भूमिका उच्च शिक्षण सचिवांनी घेतली व कोणत्याही आधाराशिवाय वेतनपूनर्रचनेशी ती बाब जोडून देण्यात त्यांनी यश मिळविले.

८.२ शेवटी महाराष्ट्राचे तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. शरदराव पवार यांना याबाबतीत लक्ष घालावे लागले. १९८८ च्या डिसेंबरमध्ये सतत ५ दिवस महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी त्यांनी चर्चा केली. **एक म्हणजे** कार्यभाराविषयीचे सर्व तपशील महाराष्ट्रात सर्वोच्च स्तरावर यापूर्वीच अंतिम झालेले आहेत, **दुसरे म्हणजे** त्यानंतर कोणत्याही नवीन सूचना आयोगाने दिलेल्या नाहीत, **तिसरे म्हणजे** मुख्य नियमाच्या एका परंतुकाचा शिक्षण सचिव चुकीचा अर्थ लावत आहेत. **चौथे म्हणजे** भारतातील कोणत्याही विद्यापीठामध्ये या सूचनांचा महाराष्ट्रातील शिक्षण सचिव लावतात तसा अर्थ लावल्या गेलेला नाही व **पाचवे म्हणजे** वेतन आयोगाची अंमलबजावणी व कार्यभारवाढीचा संबंध विद्यापीठ अनुदान आयोगाने एकमेकाशी जोडलेला नाही व त्यामुळे भारतात असे कुठेही झाले नाही. या पाच गोष्टी जेव्हा मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आल्या तेंव्हा त्यांना आश्चर्य वाटले.

**थकीत बाकी अदा करण्याचा प्रश्न हा केवळ थकबाकी अदा करण्याशी संबंधित नसून केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या समग्र योजनेची जशीच्या तशी अंमलबजावणी करण्याशी तो संबंधित आहे.**

( महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २१ एप्रिल २०१९ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद १३.१ पहा. )

त्यांच्याच पुढाकाराने उभयपक्षी मतैक्यपत्र स्वाक्षरीत होऊन १२ डिसेंबर १९८८ रोजी सुरू झालेले आंदोलन १८ जानेवारी १९८९ रोजी मागे घेण्यात आले.

८.३ पाच दिवस झालेल्या चर्चेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या आपल्याला महाराष्ट्रात जशाच्या तशा लागू करावयाच्या हे सूत्र मा.मुख्यमंत्र्यांनी मजबूत धरून ठेवले होते. त्यामुळेच दिनांक १८ जानेवारी १९८९ रोजी उभयपक्षी स्वाक्षरित झालेल्या मतैक्यपत्रात पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे आला:-

"(1) The Government of India suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges Dt., 17th June, 1987 as amended by subsequent agreement dt. 4th and 5th Sept. 1987 and the Government of India's suggestions dt. 22nd July, 1988 **would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotions involved there in as a composite scheme w.e.f. 1.1.1986,"**

### पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी

९.१ राज्यस्तरावर कोणतेही आंदोलन न होता पाचव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी महाराष्ट्रात सुरू झाली याचे फार मोठे श्रेय तत्कालीन मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील व तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना जाते. सालाबादप्रमाणे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने संघर्षाची जोरदार तयारी केली होती. तत्कालीन कायदेशीर व घटनात्मक तरतुदीनुसार "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची केंद्रशासन मान्य व्यवस्था" लागू करण्या न करण्याचा अधिकार राज्यशासनाला होता. पण एकदा ती व्यवस्था लागू करण्याचा निर्णय घेतल्यावर त्यामध्ये जोड-तोड किंवा तोडफोड करण्याचा अधिकार राज्यशासनाला जसा आज नाही तसा तो त्यावेळीही नव्हता. या बाबींचा सूक्ष्म अभ्यास तत्कालीन उच्च शिक्षण मंत्र्यांनी केला होता.

९.२ आपण सत्तेवर येण्यापूर्वीच्या शासनाने इतर सर्व वर्गांना पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे **हे एक, दुसरे म्हणजे** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा एकच वर्ग आज वंचित राहिलेला आहे. **तिसरे म्हणजे** फक्त या एकाच वर्गाला वेतनश्रेण्या अजिबात लागू न करण्याचा निर्णय आजघडीला घेणे जवळ जवळ अशक्य आहे. **चौथे असे की,** एकदा लागू करावयाचे ठरविले की, घटनात्मक व कायदेशीर तरतुदींमुळे केंद्राच्या व्यवस्थेमध्ये आपल्याला बदल करता येत नाही. **पाचवे असे की,** या एकट्या वर्गाच्या बाबतीत जवळ जवळ १२०० कोटी रूपयाची मदत केंद्र शासनाकडून मिळणार आहे. याबाबतची तपशीलवार माहिती मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी करून घेतली होती.

९.३ तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांच्या कार्यपद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य नमूद केले पाहिजे ते असे की, या प्रकरणाचा तपशीलवार अभ्यास तर त्यांनी केलेलाच होता पण मा. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून "केंद्राची व्यवस्था राज्यात जशीच्या तशी लागू करण्याविषयीचा तपशीलवार प्रस्ताव" मंत्रिमंडळामध्ये मान्य करवून घेतला होता व त्यानंतरच या महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे त्या दिवशी "हे मला मान्य आहे पण याला वित्त विभागाची मान्यता घ्यावी लागेल. मला ते वित्त विभागाकडे पाठवावे लागेल" किंवा "आमच्या विभागाला तुमचे म्हणणे मान्य आहे पण हा विषय मंत्रिमंडळासमोर नेल्याशिवाय किंवा मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्याशिवाय मला कोणताही निर्णय घेता येणार नाही" असे सांगण्याची पाळी उच्च शिक्षण मंत्र्यांवर आली नाही.

९.४ दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी सायंकाळी या महासंघाच्या कार्यकारी मंडळाला त्यांनी चर्चेसाठी बोलाविले होते. या चर्चेची सुरुवातच त्यांनी "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या केंद्रशासन मान्य वेतन व्यवस्थेची अंमलबजावणी जशीच्या तशी लागू करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे" असे ठामपणे या महासंघाच्या कार्यकारी मंडळाला सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, "एखादी लहान-सहान गोष्ट राहून गेली असेल तरी मी माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून ठेवले आहे. मा.मुख्यमंत्र्यांचा आता थोड्या वेळापूर्वी फोनही होता. काही राहिले असेल तर आपणाला मुख्यमंत्र्यांकडे जाऊन यावे लागेल."

९.५ या सभेला अनुपस्थित असलेल्या उच्च शिक्षण सचिवांनी सभेत उपस्थित असलेल्या सचिवालयीन कर्मचाऱ्यांना फोनवरून काही सल्ले देऊन अडथळे आणण्याचा प्रयत्न केला मात्र मंत्रिमंडळात मान्य झालेला प्रस्ताव यथोचित असल्यामुळे तो प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाला. मा.मुख्यमंत्र्यांकडे जाण्याची वेळ आली नाही. मा.उच्च शिक्षण मंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली उभयपक्षी मान्य झालेल्या मतैक्यपत्रातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"The Government of India have, after taking into consideration the recommendations of University Grants Commission, decided to revise the pay-scales of teachers in the Central Universities and Colleges, vide their letter dated 27th July, 1998. Government of India, vide their letter dated 27th July 1998, 6th November, 1998 & UGC's notification dated 24th December, 1998 informed the State Government of the same for consideration.

Government of Maharashtra has considered these aforesaid letters and notification and has taken the decision as follows :- The Government of India's suggestions on "Revision of payscales of teachers in Universities and Colleges following the revision of payscales of Central Government employees on the recommendations of 5th

---

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

**Affiliated to the AIFUCTO**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B Road, Churchgate, Mumbai - 400 020**

***************************

***महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत संमत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार त्या त्या***

# विद्यापीठ मुख्यालयासमोर

# धरणे आंदोलन

## सोमवार, दि. १७ जून २०१९ दुपारी ४ वाजता

*विद्यापीठांवर आलेल्या या घटनात्मक संकटाच्या प्रसंगी मा.कुलगुरुंनी मौन न पाळता निश्चित व उघड भूमिका घेऊन नोकरशाहीचा प्रयत्न हाणून पाडावा अशी त्यांना विनंती केली जाईल.*

**मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी केंद्राकडून अर्थसहाय्य मिळविण्याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे सादर करण्याचे मुदतबंद आश्वासन या महासंघाला लिखित स्वरूपात दिलेले असतांना व मा.मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाशी सुसंगत अशा मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाविषयी कमालीची तुच्छतेची भावना मनात बाळगणाऱ्या नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा तीव्र निषेध करण्यात येत असून**

( महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २१ एप्रिल २०१९ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद १६ पहा. )

Central Pay Commission" dated the 27th July, 1998 amended vide a letter dated 6th November, 1998 including UGC's notification dated 24th December, 1998 **would be implemented by the State Government with recommended scales of pay, as a composite scheme with effect from 1.1.1996..."**

### *सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी*

**१०.१ उच्च शिक्षण विभागातील अधिकारी मनमानी कशी करतात व ते मंत्रिमंडळात त्यांना पाहिजे ते निर्णय कसे करवून घेतात याचा ऐतिहासिक नमुना** सन २००९ मध्ये पहायला मिळाला. १ जानेवारी २००६ पासून लागू झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात लागू केल्या तर जवळ जवळ १५१० कोटी रुपयाचे अनुदान केंद्र शासन महाराष्ट्राला देईल असे केंद्रीय शिक्षण विभागाने महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण विभागाला लेखी कळविले होते. केंद्राची एक रुपयाची मदत नाही मिळाली तरी चालेल पण या शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या द्यायच्याच नाहीत असे उच्च शिक्षण सचिवांनी स्वतःशीच ठरवून टाकले होते. दिनांक १४ जूलै २००९ पासून महासंघातर्फे सुरु करण्यात आलेल्या बेमुदत काम बंद आंदोलनाचा परिणाम म्हणून दिनांक १५ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मा. उच्च शिक्षण मंत्री व सचिव यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी निमंत्रण दिले व महासंघासोबत दिनांक १५, १६ व १८ जुलै २००९ रोजी महासंघाच्या मागण्या संदर्भात चर्चा केली. मागण्यासंदर्भात चर्चा करुन उभयपक्षी मतैक्यपत्र तयार करण्यापेक्षा **आमचे म्हणणे आम्ही तुम्हाला कळवू** असे म्हणून चर्चा संपली. २३ जुलै रोजी सचिवांनी अत्यंत चूकीचा निर्णय मंत्रिमंडळामध्ये करवून घेतला. शासनाने **दिनांक २४ जुलै २००९** रोजी आंदोलनाच्या मागण्यासंदर्भात एक पत्र महासंघाला दिले. सदर पत्राच्या वाचनानंतर महासंघासोबत सचिव फार मोठा घातपात करीत आहेत हे महासंघाच्या लक्षात आले. कारण या पत्रात सचिवांनी असे स्पष्टपणे नमूद केले होते की मंत्रिमंडळाने "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" या वाक्याचा अर्थ पत्र लिहिणाऱ्यांना कळला की नाही हे त्यांचे त्यांना ठाऊक पण महासंघाला तो नक्की कळला होता. उपरोक्त वाक्याच्या वाचनाने महासंघाच्या कार्यकारी मंडळाला आश्चर्य वाटले. **महाराष्ट्रभर प्राध्यापकांमध्ये या वाक्यामुळे संतापाची लाट उसळली.** दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत शासनाच्या या पहिल्या पत्राच्या निषेधाचा एक तपशीलवार ठराव संमत करुन तो मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना पाठविण्यात आला.

१०.२ महासंघाच्या अनेक नेत्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांच्या कानावर सचिवांच्या या दुष्टबुद्धीच्या प्रस्तावाची माहिती दिली. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी याबाबतची स्वतंत्रपणे माहिती करवून घेतलेली होती. **३० जुलैच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत २४ जुलै २००९ रोजीचा निर्णय कार्यवृत्त कायम करतांना बदलण्यात आला.**

"केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्र.१-३२/२००६/U-II/U,१(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ.बाबतच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याचा विचार करुन राज्य शासनाने **"राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना केंद्र शासनाप्रमाणे (यु.जी.सी. योजना) वेतनश्रेणी व महागाई भत्ता दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याचा व इतर भत्ते व अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे." असे उच्च शिक्षण सचिवांनी या महासंघाला ३१ जुलै २००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले.**

१०.३ दुसऱ्या ३१ जुलै २००९ च्या पत्रात "**अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.**" वेगळ्या शब्दात सांगायचे तर ही शिक्षकांनी न केलेली मागणी शासनाने मान्य केली आहे, असा अत्यंत चुकीचा निर्णय या महासंघाला कळविण्यात आला व तो ४ ऑगस्ट २००९ च्या तिसऱ्या पत्रानेसुद्धा दुरुस्त करण्यात आला नाही. म्हणजे तिसऱ्या पत्रानंतरसुद्धा दुसऱ्या पत्रातील अनुषंगिक लाभाबाबतची शासनाची भूमिका अबाधित राहिली. ती एवढी संतापजनक होती की महासंघाने त्याचा निषेध केला हे बाजूला ठेवले तरी महासंघाकडून कोणतीही तशी सूचना नसतांना विद्यापीठावरील मोर्चाच्या वेळी व जेलभरो आंदोलनाच्या वेळी उत्स्फूर्तपणे हजारो शिक्षक "सेवाशर्ती हक्काच्या, नाही कुणाच्या xxच्या" अशा संतप्त घोषणा जोरात देत होते. हा संताप किती तीव्र होता हेच त्यावरून दिसून येते.

१०.४ केंद्र शासनाची वेतन सुधाराची "समग्र योजना" या शब्दाऐवजी "केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी" हीच शब्दरचना पुन्हा पुन्हा वापरण्यात येत होती व त्या पाठोपाठ "**अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे" ही न करण्यात आलेली मागणी मान्य करुन उच्च शिक्षण सचिवांनी अत्यंत घातक असा पायंडा पाडला होता. "परिनियमांनी स्थापित झालेली सेवाशर्तींची व्यवस्था"** मोडून काढून शिक्षकांचे भवितव्य नासवू पाहणाऱ्या व त्यांचा आत्मसन्मान कस्पटासमान समजणाऱ्या सेवाशर्तींची पायाभरणी करणाऱ्या नव्या व्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवण्याची सुरुवात म्हणून सहाव्या वेतन आयोगाच्या संधीचा वापर करण्याच्या प्रयत्नांचा महाराष्ट्रभर तीव्र धिक्कार करण्यात आला. हा धिक्कार इतका तीव्र होता की मंत्रिमंडळात पुन्हा निर्णय करण्यात आला व १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयामध्ये परिच्छेद 8 (B) पुढीलप्रमाणे टाकण्यात आला:-

"8 (B) Following allowances and benefits shall be at par with the state government employees. **However for those areas where the teachers are already drawing more allowances or enjoying more benefits than the state government employee (even after the 6th pay commission) the higher rates and / or benefits shall continue i.e. the teachers shall continue to get whichever is higher (existing rates and benefits or as per state government employees after 6th pay commission.)"**

१०.५ याबाबतच्या घटनात्मक व कायदेशीर तरतुदींकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून भारतीय संविधानाच्या इतिहासात राज्यात वेतनश्रेण्या अंमलात येण्यापूर्वी आज पहिल्यांदाच केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीने याबाबतचे रेग्युलेशन्स भारत शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध झालेले असतांना उच्च शिक्षण विभागाने काढलेल्या ८ मार्च २०१९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद टाकण्यात आलेली आहे :- **"16.0 Leaves :** Study leave, maternity leave, casual leave, medical leave shall be admissible to the teachers at par with the state government

**थकबाकी अदा करण्याच्या खर्चाला मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे हे जर खरे आहे तर अदा करण्याच्या कार्यरितीचा उल्लेख शासननिर्णयात का आलेला नाही? या प्रश्नाचे उत्तर मिळणे आवश्यक आहे.**

( महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २१ एप्रिल २०१९ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद १२.४ पहा. )

employees."

**१०.६** सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा शासननिर्णय दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यावेळी निर्गमित केला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या वेतनव्यवस्थेमध्ये फेरफार करण्याचा आपल्याला अधिकार नाही याची माहिती असतांना अनेक किलोत्पाटी कारवाया करण्यासाठीची सुविधा आपल्या हाती असावी म्हणून त्या शासननिर्णयातील परिच्छेद १४ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद केली होती :- "This Government Resolution is **subject** to the decision taken by the State Government on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31.12.2008." घटनात्मक तरतुदींचा भंग करून केंद्राच्या योजनेतील अनेक तरतुदींमध्ये अघोरी बदल करण्याची सुविधा आपल्या हाती ठेवणे यापेक्षा कोणताही वेगळा हेतू उपरोक्त तरतुदींमागे नव्हता.

**१०.७** उच्च शिक्षण विभागातील या नोकरशाहीच्या कारवायांमुळे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण व उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे तसेच राज्याचे मुख्य सचिव यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी जेव्हा चर्चा केली त्यावेळी या महासंघाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, केंद्र शासनाने मान्य केलेल्या योजनेमध्ये उच्च शिक्षण विभागाने बदल करण्याची कल्पना घटनाबाह्य असल्याचे विचार मांडले. ही गोष्ट मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आल्यावर त्यांना मोठे आश्चर्य वाटले. **मा. मुख्य सचिवांनी तर त्या बैठकीत स्पष्टपणे असे नमूद केले की, "केंद्राची योजना एकदा राज्यशासनाने मान्य केली की, राज्यांना त्यामध्ये बदल करता येत नाही."** मा. मुख्य सचिवांचे हे मत ते स्वतः उपस्थित असलेल्या बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये नमूद करण्यात आले असून "आम्ही त्याप्रमाणे दुरुस्तीचा शासननिर्णय निर्गमित करू" असेही मा. मुख्यसचिवांनी नमूद केले. त्याप्रमाणे पुढे "Government of Maharashtra Higher & Technical Education Department, Corrigendum No. NGC 2009/(243/09)-UNI-1 Mantralaya Annex, Mumbai-400 032 : Date : 19 November, 2009" हा शासननिर्णय निर्गमित करण्यात आला व त्यानुसार पुढीलप्रमाणे तरतूद करणारा मजकूर मूळ शासननिर्णयात दाखल करण्यात आला :-

"This Government Resolution is **according** to the decision taken by the State Government on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31.12.2008."

**११.१** प्रत्येक वेतन आयोगाच्या शिफारशी अंमलात आणतांना महाराष्ट्रात चातुर्वर्ग व्यवस्थेचा अंगिकार करण्यात आला होता असे स्पष्टपणे दिसून येते. काही उदाहरणे नजरेखालून घालण्यासारखी आहेत. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनी प्रभावित होणाऱ्या सर्व वेतनधारकांची, १.१.९६ पासून या आयोगाच्या शिफारशी लागू करण्याच्या संदर्भात, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाने चार वर्गामध्ये विभागणी करण्यात आलेली होती. (१) **सर्व सनदी अधिकाऱ्यांच्या बाबतीत** ३०.९.९७ ला शासननिर्णय निघाला व अंमलबजावणी सुरू झाली. (२) **महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्याबाबतीत** १० डिसेंबर १९९८ च्या शासननिर्णयाने प्रत्यक्ष अंमलबजावणी बऱ्याच विलंबाने सुरू झाली. (३) **माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत** शासननिर्णय बऱ्याच विलंबाने म्हणजे १३ मे १९९९ ला काढण्यात आला. (४) **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत** असा शासननिर्णय खूपच विलंबाने म्हणजे ११ डिसेंबर १९९९ रोजी निर्गमित झाला. ही 'चातुर्वर्णीय' व्यवस्था इतकी डोळ्यात खुपणारी होती की, तत्कालीन विधानपरिषदेचे सभापती मा. श्री. ना.स.फरांदे यांनी विधानपरिषद सभागृहात पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले होते :-

"**सभापती** : कशासाठी हा सगळा गोंधळ आहे हे मला समजत नाही. विचार करण्यासाठी किती वर्षे लागतात? शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निर्णय घेऊन शासन मोकळे झाले आहे. **चातुर्वर्णाचा प्रश्न निर्माण करण्यात आला आहे. हा शब्द जरी बरोबर नसला तरी सुध्दा व्यवहार तसा आहे.** जर तसे ठरलेले आहे, केंद्र सरकारचे आदेशही आहेत. आपली कमिटमेंट आहे की, केंद्र सरकार जे काही ठरविल त्याप्रमाणे राज्य सरकार जसेच्या तसे लागू करील...." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन, गुरूवार, दिनांक १ एप्रिल १९९९ : खंड ११८, क्रमांक ९, पृष्ठ ६७-६८)*

**११.२** महाराष्ट्रातील ही चातुर्वर्ग व्यवस्था तत्परतेने संपुष्टात आणावी अशी या महासंघाने वारंवार मागणी केलेली आहे. १ जानेवारी २००६ पासून अंमलात आलेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेळीसुद्धा फक्त तारखा बदलल्या मात्र चातुर्वर्ग व्यवस्था तशीच चालू राहीली. आज आता सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी महाराष्ट्रात जुन्या चातुर्वर्ग पद्धतीनेच चालू आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १ ऑक्टोबर २०१६ रोजी एक

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दि. २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार*

## उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कार्यालयावर

# राज्यस्तरीय
# मोर्चा व निदर्शने आंदोलन

## सोमवार, दि. २४ जून २०१९

## उच्च शिक्षण संचालक कार्यालय, पुणे

## वेळ : दुपारी १२ वाजता

*शासन निर्णयाने त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यात त्यांना आलेल्या अपयशाचा निषेध करणे हा या मोर्चाचा उद्देश असेल.*
*दिनांक ८ मार्च २०१९ रोजी शासननिर्णय निर्गमित झालेला असतांना व मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी तसे आदेश दिलेले असतांना थकबाकी अदा करण्याबाबतचे प्रस्ताव अजूनही का सादर झालेले नाहीत याबाबत त्यांना विचारणा करण्यात येईल.*
*केंद्राकडे प्रस्ताव सादर करण्याबाबतचे मुदतबंद आश्वासन मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिलेले असतांना याबाबत मा.मंत्रिमहोदयांच्या निदेशांची अवहेलना होण्याची कारणे काय आहेत?*
*याबाबत चर्चेसाठी वेळ मागितली जाईल.*

शासननिर्णय निर्गमित केला व अखिल भारतीय सेवेतील जे अधिकारी महाराष्ट्र संवर्गात काम करीत आहेत त्यांना १ जानेवारी २०१६ पासून प्रत्यक्ष सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन अदायगी सुरू झालेली आहे. चातुर्वर्गापैकी या पहिल्या वर्गाला सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेण्या मिळणे सुरू झाले आहे. केंद्राने सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर प्रचंड विलंबाने महाराष्ट्रामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या वर्गासाठी सातव्या वेतन आयोगाची व्यवस्था लागू करणारा शासननिर्णय दिनांक १/३० जानेवारी २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला. सर्व स्तरावरच्या शालेय शिक्षणात काम करणाऱ्या शिक्षकांसाठी ही व्यवस्था लागू करणारा शासननिर्णय २० फेब्रुवारी २०१९ रोजी लागू करण्यात आला असून विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी ही व्यवस्था लागू करणारा शासननिर्णय दिनांक ८ मार्च २०१९ रोजी निर्गमित झालेला आहे.

### *सातव्या वेतन आयोगाचे भग्न देऊळ*

**१२.१** थकबाकीबाबत ५० टक्के केंद्र शासन व ५० टक्के राज्यशासनाचा हिस्सा ही बाब राज्याच्या मंत्रिमंडळाने मान्य केलेली असून त्याप्रमाणे शासननिर्णय निघणे हे अपेक्षित होते, पण तसे झालेले दिसून येत नाही. दिनांक ८ मार्च २०१९ रोजी जो शासननिर्णय निर्गमित करण्यात आला त्याच्या उद्देश पत्रिकेमध्ये पुढील वाक्य नमूद असल्याचे स्पष्टपणे दिसून येते :-

"The revision of Pay Scales of teachers and equivalent academic staff shall be subject to provisions of the scheme of revision of Pay scales as contained in letter dated 2nd November, 2017 and regulation issued by UGC dated 18th July, 2018 and amendments thereof from time to time in this behalf."

केंद्राच्या निर्णयाप्रमाणे ही योजना अंमलात आणावयाचे हे जर खरे आहे तर उपरोक्त वाकसंहिता ही शंभर टक्के बिनचूक आहे. मात्र पुढे याच शासननिर्णयाच्या सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये असे नमूद आहे की,

"After considering all the aspects, the state government has decided to implement and revise pay scales and terms and conditions of services as detailed below :"

**१२.२** "केंद्र शासनाची व्यवस्था आम्ही महाराष्ट्रात जशीच्या तशी अंमलात आणू" हे वाक्य सुरुवातीला शासननिर्णयात नमूद करावयाचे व त्याच शासननिर्णात "आम्ही ही योजना पुढीलप्रमाणे अंमलात आणण्याचे ठरविले आहे" असे भारतीय घटनेतील तरतुदींचा सरळ सरळ भंग करणारे दुसरे वाक्य त्याच शासननिर्णयात टाकायचे व या दोन वाक्यातील फरक महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राला कळणार नाही असे गृहीत धरण्याची सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी केलेली चूक उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने सातव्या वेतन आयोगाच्या वेळीसुद्धा पुन्हा केलेली आहे.

**१२.३** दिनांक ५ मार्च २०१९ रोजी मंत्रिमंडळामध्ये निर्णय करून घेतल्यानंतर तो निर्णय अधिकृतपणे जाहीर करणारे प्रसिद्धीपत्रक मा.मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील जनसंपर्क कक्षातर्फे प्रसृत करण्यात आले. त्यामध्ये पुढील उल्लेख आहे :-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**"

**१२.४ थकबाकी अदा करण्याच्या खर्चाला मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे हे जर खरे आहे तर अदा करण्याच्या कार्यरितीचा उल्लेख शासननिर्णयात का आलेला नाही?** या प्रश्नाचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. फक्त थकबाकीचा किती भाग कोण देईल एवढेच ८ मार्च २०१९ रोजीच्या शासननिर्णयात परिच्छेद (25) (iv) मध्ये पुढील शब्दात नमूद आहे :-

"(iv) The additional expenditure on pay proper, on account of revision of scales of pay of teachers in University, Government and Non Government collages as on 1st January, 2016 shall be shared for the period from 1st January, 2016 to 31st March, 2019 between the Government of India and the State Government in the ratio of 50:50."

**१२.५** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करणारे नियम समाविष्ट असलेली अधिसूचना ३० जानेवारी २०१९ च्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग चार मध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. त्यातील नियम १४ मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे :-

**"14. Mode of payment of arrears of pay. -** (1) The arrears of pay entitled to Government servant on account of revision of pay under these Rules, for the period from the 1st day of January 2016 to the 31st day of December 2018 (both inclusive) shall be credited to the General Provident Fund (GPF) or Applicable Pension Scheme, as the case may be, in five equal instalments over the next five years from financial year 2019-2020;"

**१२.६** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित सेवानिवृत्त वेतन लागू करणारा शासननिर्णय दिनांक २४ जानेवारी २०१९ रोजी निर्गमित झाला. त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"6. Pension should be revised from 1st January 2016. But the pensioners **will get actual benefit of revised pension from 1st January 2019. The arrears due to revision with effect from 1st January 2016 to 31st December 2018 should be paid in cash in five equal instalments over the next five years. The first instalment, due in the year 2019,** will be paid along with monthly pension of the month of June 2019. Further, the **remaining instalments should be paid along with monthly pension of June every year."**

**१२.७** थकबाकी अदा करण्याच्या खर्चास मान्यता दिल्यानंतरसुद्धा त्या बाबतीत कोणतीही तरतूद दिनांक ८ मार्च २०१९ रोजीच्या शासननिर्णयामध्ये दाखल करण्यात आलेली नाही. इतकेच नव्हेतर तर केंद्रीय निर्णयानुसार ज्या अटींच्या अधीन राहून केंद्र शासनाकडून ही मदत मिळणार आहे त्यातील एकाही महत्त्वाच्या अटीचा उल्लेख या शासननिर्णयात नाही. केंद्र शासनाच्या दिनांक २ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या ज्या पत्राचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्या पत्राच्या परिच्छेद १६ च्या उपपरिच्छेद (iv)(h) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे:-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition **that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by Stale Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification** except in regard to the date of implementation and pay scales mentioned herein above."

**मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतरसुद्धा ८ मार्च २०१९ च्या शासननिर्णयामध्ये त्याबाबतचा एका शब्दानेही उल्लेख असू नये, या मागचे कारस्थान महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राच्या लक्षात येणार नाही असे नोकरशाहीने गृहीत धरलेले आहे.**

( महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २१ एप्रिल २०१९ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद १६ पहा. )

**१३.१ थकीत बाकी अदा करण्याचा प्रश्न हा केवळ थकबाकी अदा करण्याशी संबंधित नसून केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या समग्र योजनेची जशीच्या तशी अंमलबजावणी करण्याशी तो संबंधित आहे.** तशी स्थिती यापूर्वी प्रत्येकच वेळेला होती. सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळेला त्याबाबतीत फार मोठा न्यायालयीन संघर्ष झाला. त्याची पुनरावृत्ती सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष अशा विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्थापित केलेल्या व केंद्र शासनाने मान्य केलेल्या वेतन व्यवस्थेची अंमलबजावणी करीत असतांना होत आहे असे दिसून येते. सहाव्या व सातव्या आयोगाच्या घटनाक्रमात एक फरक असा आहे की, सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी याचिका ही विद्यार्थ्यांच्या संघटनेने दाखल केली होती. आज ती शिक्षकाच्या संघटनेला दाखल करावी लागेल असे स्पष्टपणे दिसून येत आहे.

**१३.२** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळासोबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५.२.२०१३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता वर्षा निवासस्थानी आयोजित करण्यात आलेली बैठक रात्री ठिक १०.०० वाजता सह्याद्री अतिथीगृहावर सुरू झाली. या बैठकीला मा. मुख्यमंत्र्याशिवाय मा. उपमुख्यमंत्री, मा. शिक्षण मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) अप्पर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, वित्त व इतर अधिकारी उपस्थित होते. बैठक रात्री ११.३० वाजेपर्यंत चालली. या बैठकीत मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी या महासंघाच्या शिष्टमंडळाला स्पष्टपणे असे सांगितले की, "मी स्वतः मा.पंतप्रधानांच्या कार्यालयात राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. थकबाकीसाठी एवढी मोठी रक्कम केंद्रसरकार एकदम देईल अशी केंद्राची आर्थिक स्थिती नाही." "पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्र शासनाने कबूल केली तेवढी रक्कम राज्यांना दिली आहे. त्यांनी शब्द पाळला नाही. असे एकही उदाहरण नाही" असे महासंघातर्फे सांगण्यात आले. पण ते म्हणणे मुख्यमंत्र्यांना मान्य झाले नाही. "आज तेथे तशी परिस्थिती नाही" असेच ते म्हणत राहिले.

**१३.३** मा.मुख्यमंत्र्यांनी आणखी एक मुद्दा या महासंघाला असा सांगितला की, "राज्याने थकबाकी अदा केल्यावर केंद्रशासन किती मुदतीत परतावा देईल हे सुद्धा केंद्राच्या पत्रामध्ये नमूद नाही. त्यामुळे आम्ही ५०० कोटी रूपयाचा थकबाकीचा पहिला हप्ता अदा करू व त्याचा परतावा आल्यावर पुढची कारवाई करू." महासंघातर्फे मा.मुख्यमंत्र्यांना असे सांगण्यात आले की, "केंद्र सरकार थकबाकी 'देणारे' आहे, आपण 'घेणारे' आहोत. केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे केंद्राचा शासननिर्णय निर्गमित झालेला आहे. राज्याने हप्त्या हप्त्याने थकबाकी देतो म्हटले तर त्यांच्याकडून एक रुपयाचा परतावा मिळणार नाही. एकमुस्त थकबाकी अदा करा व त्यानंतरच परताव्याचा प्रस्ताव पाठवा असे त्यांच्या शासननिर्णयात नमूद आहे" पण मा.मुख्यमंत्र्यांना ही गोष्ट मान्य झाली नाही.

**१३.४** दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजी मा.मुख्यमंत्र्यांशी झालेल्या या चर्चेमध्ये महासंघातर्फे आणखी एक महत्त्वपूर्ण मुद्दा मांडण्यात आला. उत्तरप्रदेश विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघाचे समन्वयक डॉ.हृदयनाथ त्रिपाठी विरुद्ध उत्तर प्रदेश शासन या प्रकरणात (No. 64068 of 2011) एक महत्वपूर्ण निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयामध्ये दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजी झालेला होता. उत्तर प्रदेश शासनाने "**केंद्राकडून निधी आल्यावर आम्ही थकबाकी देऊ**" असे आदेश २१ ऑगस्ट २०११ रोजी काढले होते. **उत्तर प्रदेश शासनाचा हा आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला व एकमुस्त थकबाकी देण्याचे पुढील शब्दात आदेशित केले.**:- "In view of the aforesaid facts, we are of the view that the **stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained.** The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Central Government for reimbursement of the amount so incurred towards the payment of arrears of salary. **For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed. Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed.** The State Government is directed to release the necessary fund for payment of arrears of salary of teachers of National Post Graduate College, Barhalganj, Gorakhpur within a maximum period of one month, from the date of receipt of certified copy of this order."

**१३.५ महासंघातर्फे हायकोर्टाचा निर्णय समजावून सांगण्याचा बराच प्रयत्न करण्यात आला पण मा.मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण काही ऐकून घ्यायला तयारच नव्हते.** तसे शब्द त्यांनी वापरले नाही पण एकंदर त्यांची देहबोली अशी होती की, "ते हायकोर्टाच वगैरे मला काही सांगू नका. काय तुम्हाला त्यावर कोर्टकचेरी करावयाची असेल ती तुम्ही करून घ्या." त्यांच्याच पक्षाचे केंद्रसरकार आणि त्यांच्याच पक्षाचे पंतप्रधान व केंद्रीय मानव संसाधन मंत्री असतांना १५०० ते १६०० कोटी रुपयांचे केंद्राचे अनुदान घेण्यासाठीच्या केंद्रशासनाच्या सूचना मान्य करायला ते तयार नव्हते व "५०० कोटींचा पहिला हप्ता आम्ही देऊ" असा हेका धरून बसले होते.

**१३.६** शब्दात मुख्यमंत्री तसे बोलले नाहीत. पण पूर्वीचे मा.मुख्यमंत्री

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

**Affiliated to the AIFUCTO**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B Road, Churchgate, Mumbai - 400 020**

***************************

# मुंबई येथे राज्यस्तरीय धरणे आंदोलन

## सोमवार, दि. १ जुलै २०१९

## वेळ : दुपारी १२ ते ४

*पूर्व सूचनेने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी वेळ ठरवून त्यांना मंत्रालयात भेटून संघटनेचे पदाधिकारी आंदोलनाचा ठराव व विशेषांक पुन्हा सादर करतील. त्यांनी वेळ न दिल्यास, मा. उच्च शिक्षण राज्यमंत्री यांना भेटून किंवा त्यांनीही वेळ न दिल्यास उभय मंत्र्यांच्या कार्यालयात आंदोलनाचा ठराव व विशेषांक सपत्र सादर केला जाईल. त्याच दिवशी राज्याचे मा. मुख्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून ठरावाची प्रत सादर करण्यात येईल.*

श्री.अशोकराव चव्हाण व मा.उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेशजी टोपे यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना मध्ये घालून थकबाकी अदा करण्याबाबतचे जे लेखी आश्वासन महासंघाला दिले होते ती गोष्ट त्यांना आवडलेली नव्हती. राज्यशासनाचे हित व्हावे यादृष्टीने एखाद्या गोष्टीचा आग्रह धरणे ही गोष्ट वेगळी पण मा.मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी थकबाकी अदा करण्याबाबत जी भूमिका घेतली होती ती केवळ शिक्षकांच्या विरोधातच नव्हती तर शिक्षक या वर्गाविषयी ओतप्रोत द्वेषाने भरलेली होती व त्यामुळेच ते "केंद्रशासन निधी देऊ शकणार नाही, केंद्रशासनाची आर्थिक स्थिती बरोबर नाही" अशी अत्यंत चुकीची भूमिका कवटाळून बसले होते. चर्चेमध्ये एकवेळ अशी आली की, मुख्यमंत्री तेच ते बोलत होते व त्यावर महासंघाचे प्रतिनिधी आपले तेच ते म्हणणे मांडत होते. शेवटी महासंघातर्फे "**आजच्या चर्चेचे जे काय कार्यवृत्त असेल ते आम्हाला द्या म्हणजे मग आम्हाला त्याबाबत निश्चित भूमिका घेता येईल**" असे सांगण्यात आले व तेथेच ती चर्चा संपली.

**१३.७ "मा. मुख्यमंत्री यांच्या कडे दि. ६.२.२०१३ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत..**" या मथळ्याचे कार्यवृत्त महासंघाच्या अध्यक्षांना दिनांक ९ फेब्रुवारी २०१३ च्या उच्च शिक्षण विभागाच्या पत्रान्वये प्राप्त झाले. यामध्ये थकबाकी अदा करण्याबाबत पुढील मजकुर होता.

"(१) (i) राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेनुसार दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.३.२०१० या कालावधीतील वेतन फरकाच्या थकबाकीची केंद्र शासनाच्या हिश्याची (८० टक्के) रुपये १५२६.५० कोटी इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.

(ii) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दि. ३१.१२.२००८ च्या आदेशामध्ये उक्त ८० टक्के रक्कम केंद्रीय अर्थसहाय्य म्हणून राज्य शासनास देण्यात येईल असे स्पष्ट केले होते. **तथापि, दि. १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये मात्र वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे.** सदर २ ते ३ हप्त्यातील रक्कम किती कालावधीत राज्य शासनास अदा करण्यात येईल, त्याबाबत केंद्र शासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केले नाही. **तसेच केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिस्स्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे.**

(iii) केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेता सदर रु. १५२६.५० कोटी इतक्या रक्कमेपैकी रुपये ५००.०० कोटी इतक्या रक्कमेचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल.

(iv) तदनंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपुर्ती होईल, तेवढी रक्कम राज्य शासनाकडून दुसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतुद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल.**

(v) त्याचप्रमाणे राज्य शासनाने अदा केलेल्या दुसऱ्या हप्त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपूर्ती होईल तेवढी रक्कम राज्य शासनाकडून तिसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतूद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल."**

**१३.८** दिनांक ९ मार्च २०१३ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक होऊन उच्च शिक्षण विभागाने पाठविलेले पत्र विचारात घेण्यात आले व थकबाकी अदा करण्याचा या पत्रातील प्रस्ताव फेटाळून लावण्यात आला. "**हे 'अशा प्रकारे' केले तरच आम्ही ८० टक्के थकबाकी देऊ ही केंद्राची व्यवस्था सांगायची व त्यापाठोपाठच केंद्र शासनाचे हे धोरण लक्षात घेता आम्ही 'तशाप्रकारे' न करावयाचे ठरविले आहे.**" असा निर्णय कळवावयाचा. या शासनाच्या कृत्याची महासंघाच्या या ठरावात तीव्र निर्भत्सना करण्यात आली होती.

**१४.१** विद्यार्थी संघटनेने परीक्षा असहकार आंदोलनाबाबत सन २०१२ मध्ये दाखल केलेली एक याचिका (क्रमांक १३२६) मा. उच्च न्यायालयासमोर प्रलंबित होती. दिनांक १० मे २०१३ रोजी मा. मुख्य न्यायाधिशांच्या खंडपीठासमोर ती याचिका अंतिम सुनावणीसाठी आली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने मा.मुंबई उच्च न्यायालयासमोर महासंघाच्या तत्कालीन सचिव श्रीमती तापती मुखोपाध्याय यांनी त्याच दिवशी म्हणजे दिनांक १० मे २०१३ रोजी एक शपथपत्र (यापुढे उल्लेख ***"महासंघाचे शपथपत्र"*** असा) दाखल केले होते.

**१४.२** मा.उच्च शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्या स्तरावर या महासंघाशी चर्चा होऊन मतैक्यपत्र नोंदविण्यात आले होते व केंद्राने थकबाकी दिली नाही तर ती राज्यशासन देईल असे मान्य करण्यात आले होते ही गोष्ट महासंघाच्या या शपथपत्राच्या परिच्छेद 3(A)(i) मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आली होती :-

"(i) I say that the scheme of pay revision under the sixth pay recommendations envisaged by the Union HRD Ministry and notified by the apex bodies UGC/AICTE is a composite scheme and only after its implementation in full the State would be entitled to receive 80% of the additional expenditure from the Union Government and the remaining 20 per cent will be the sole liability of the State. I say that during the academic year 2009-10, MFUCTO had called teachers to participate in an indefinite cease work which was called off after an Understanding was reached on 26th August 2009 which was converted into Minutes of the

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHER'S ORGANISATION**
University Club House, B-Road, Churchgate,
Mumbai 400 020

**PRESIDENT** — Prof. Dr. Tapati Mukhopadhyay
**GENERAL SECRETARY** — Prof. Dr. S.P. Lawande

**29 APRIL 2019**

To
Shri Devendra Fadnavis,
Honorable Chief Minister, Maharashtra State,
Mantralaya, Mumbai 400 032

**Sub :** Resolution adopted at the Executive Committee meeting of Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations (MFUCTO)

Honorable Sir :

We are enclosing herewith the copy of the Resolution unanimously adopted at the Executive Committee meeting of Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations (MFUCTO) held at Amravati on Sunday April 21, 2019.

The Executive Committee members of MFUCTO have made critical observations on certain issues relating to the revised pay scale and terms and conditions of the services as mentioned in the Government Resolution No. Misc-2018/ C.R.56/18/UNI-l dated March 8, 2019. The Resolution has also brought out a number of anomalies as seen in the said order while comparing them with the UGC Regulations - Gazette Notification dated 18 July 2018.

We request you to please go through the points raised in the attached Resolution of MFUCTO and take necessary actions to resolve these anomalies.

Yours Sincerely

Dr. Tapati Mukhopadhyay (President) — Dr.S.P.Lawande (General Secretary)

Enclosure : Copy of MFUCTO Resolution

**तळटीप** :- याच अर्थाचे पत्र ठरावासह ३० एप्रिल २०१९ या तारखेला मा.उच्च शिक्षण मंत्री व उच्च शिक्षण सचिव यांना सादर करण्यात आलेले आहे.

## संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणीच्या तातडीच्या सभा

संघटनेच्या जिल्हा कार्यकारी मंडळांच्या व तालुका कार्यकारी मंडळांच्या तातडीच्या बैठकी आयोजित करण्यात याव्यात. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व तालुका पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यामध्ये व तालुक्यामध्ये दौरे आयोजित करुन उपरोक्त मेळावे/आंदोलन यशस्वी करण्यासाठी कार्यरत व्हावे **अशी विनंती करण्यात येत आहे. - डॉ. विलास ढोणे, सचिव "नुटा"**

Meeting 26-8-2009 as at Ex. C. The agreed position on arrears was stated in the said Minutes as under:

"1 The State Government having taken into consideration the Composite Scheme submitted by the central Government, had issued Government Resolution dated 12th August 2009. While implementing the said Scheme, the aim will be to get 80 per cent of the financial assistance from the Central Government., If this 80% financial assistance from the Central Government is not received, the State Government shall pay 80% arrears as given to the State Government employees."

१४.३ संपूर्ण थकबाकी ही राज्यशासनाने प्रथम अदा करावयाची आहे व त्यानंतर परताव्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावयाचा आहे. ही रक्कम अदा केलेल्या रकमेच्या परताव्याच्या (reimbursement) स्वरूपात दिली जाईल हे केंद्र शासनाने राज्यशासनाला वारंवार कळविले आहे. असे महासंघाच्या शपथपत्रात परिच्छेद 3(A)(ii) मध्ये नमूद होते. ते पुढील शब्दात :-

"(ii) I say and submit that the Union Ministry of Human Resource Development has come out with letter No.F.1-7/2010-U.II dated 14th August 2012 by which it was directed in para.3, 6 & 8 as under:

"3. Central Government has decided to provide financial assistance, for the period 1-1-2006 to 31-3-2010, to the extent of 80% as **reimbursement** to those state governments which may opt for the revised pay scales. The State Governments were to provide 20% of arrears from their own resources.

"6. State governments may please note that reimbursement of 80% of central share of the additionality of payment of arrears, for the period from 1-1-2006 to 31-3-2010 will be made by the central government in 2-3 installments. However, this would be by way of reimbursement only after the state government has made payment. In this connection, this Ministry letter of even number dated 11-5-2010 also refers.

"8. You are requested to kindly take further necessary action in this regard as detailed above and furnish the requisite information to this department urgently to enable us to process the release of central share accordingly.

I say that by letters dated 14th August 2013 and 14th November 2012 the HRD Ministry has called upon the **State Governments to release the 100% arrears in full and submit claim certificate so that 80% thereof would be released by the centre in 2-3 installments.** I crave leave to refer to and rely on the said documents when produced."

१४.४ अलाहाबाद उच्च न्यायालयाने याबाबतीत दिलेला हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात फिरविला गेलेला नव्हता किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही मा.उच्च न्यायालयाने त्याहून वेगळा निर्णय दिलेला नव्हता. मा.मंत्रिमहोदय व सचिव यांच्याशी झालेल्या बैठकीच्या वेळी मा.अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निर्णय या महासंघाने वारंवार त्यांच्या लक्षात आणून दिला ही बाब महासंघाच्या शपथपत्राच्या परिच्छेद 3(A)(iii) मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली होती :-

"(iii) I say that government's decision in respect of release of arrears is totally contradictory to the Union government directions contained in its letters dated 14th August 2012 and 14th November 2012. I say and submit that MFUCTO in its meetings with the Government had pointed out that the arbitrary decisions of the government was also against the **Judgment and Order dated 17th January 2013 of the Hon'ble Allahabad High Court in W.P. No.64048 of 2011 which had quashed and set aside the UP Government's order to the effect that arrears of sixth pay commission revised scales of pay will be released only after the 80 per cent of additional expenditure**

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

**Affiliated to the AIFUCTO**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B Road, Churchgate, Mumbai - 400 020**

***************************

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दि. २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार राष्ट्रीय राजधानी**

# दिल्ली

# धरणे आंदोलन

## सोमवार, दि. २२ जुलै २०१९

## वेळ : दुपारी १२

*त्यादिवशी मोर्चाने देशाचे मा.मानव संसाधन मंत्री यांना निवेदन सादर करण्यात येईल. भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टातील केंद्रसूचीमध्ये ६६ व्या क्रमांकाच्या विषयाने केंद्र शासनाला प्राप्त झालेले अधिकार, त्या अधिकारांचा वापर करून केंद्र शासनाने केलेला १९५६ चा विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा, त्या कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करून भारत शासन राजपत्रामध्ये प्रख्यापित करण्यात आलेले 'रेग्युलेशन्स' पायदळी तुडविणाऱ्या उघडउघड घटनाबाह्य अपकृत्त्याची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येईल. त्याच बरोबर केंद्र शासनातर्फे जे परतावा अनुदान राज्यांना दिले जाते त्याबाबतच्या अटींचा काळजीपूर्वक अभ्यास करूनच याबाबतचा प्रस्ताव राज्यशासनाने सादर करावा असे केंद्राने राज्याला कळविण्याविषयी केंद्रशासनाला विनंती करण्यात येईल.*

**was received from the central government."**

**१४.५** दिनांक १० मे २०१३ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयात याबाबत काय निर्णय झाला ते आता पाहू. महासंघाचे शपथपत्र मा. न्यायमूर्तीच्या हातात होते व त्याबाबत ते सरकारी वकीलांना पुन्हा पुन्हा विचारीत होते. सरकारी वकिल झाले तरी ते शेवटी कायद्याचे तज्ञ असतात. "अलाहाबाद हायकोर्ट वगैरे मी काही जाणत नाही" अशी जंगली भाषा आपण न्यायपीठासमोर वापरू शकत नाही याची त्यांना जाणीव असते. न्यायालयात उपस्थित असलेल्या सहसचिवांना त्यांनी मंत्रालयात बोलून घ्या असे सांगितले व सरळ सरळ न्यायपीठासमोर संपूर्ण थकबाकी देण्याची कबूली दिली. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये याबाबतचा परिच्छेद २ आला. तो शब्दशः पुढील प्रमाणे :-

"(2) So far as the first demand is concerned, Dr.Mukhopadhyay has given the past events. We do not propose to go into the dates and events referred to in the affidavit but we record the statement being made by Mr.Saluja, learned A.G.P. under instructions of Mr. G. S. Rasal, Joint Secretary to the Government of Maharashtra, Higher Education and Technical Education Department, that the arrears of salary on the basis of 6th Pay Commission recommendations have **partly been paid in March 2013 and that the balance amounts will be released by 31 July 2013.**"

केवळ मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी बऱ्याच उशिराने का होईना पण विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना थकबाकी मिळाली. दुर्दैवाने सातव्या वेतन आयोगाच्या वेळीसुद्धा न्यायालयात जाण्याची वेळ या शिक्षकांवर आली तर उपरोक्त इतिहास, घडलेला घटनाक्रम व मा.उच्च न्यायालयाचे निर्णय ही अत्यंत उपयुक्त साधनसामुग्री ठरेल.

**१५.१** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबत केंद्रशासनाकडून निरनिराळ्या राज्यांना दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याची योजना आता केंद्रशासनाने दिनांक १ जुलै २०१८ पासून बंद केलेली असून याबाबतची अधिकृत माहिती राज्यसभेमध्ये दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी दिलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक २४१ ला केंद्रीय मानव संसाधन मंत्री मा. श्री. प्रकाश जावडेकर यांनी दिलेल्या उत्तरामध्ये तपशीलवारपणे नमूद केलेली आहे.

**१५.२ देशातील २९ राज्यांपैकी फक्त १४ राज्यांनीच सर्व अटी शर्तीचे पालन करून त्या योजनेची अंमलबजावणी केली व परिपूर्ण प्रस्ताव सादर करून केंद्राकडून मिळणारे संपूर्ण अनुदान प्राप्त करून घेतले.** इतर १५ राज्यांनी सर्व अटींसह तशी अंमलबजावणी न केल्यामुळे त्यातील काही राज्यांना केंद्राचे परतावा अनुदान अजिबात मिळाले नाही किंवा काहींना ते अंशतः मिळाले. ही बाब मा. मानव संसाधन मंत्र्यांच्या या उत्तरामध्ये पुढील शब्दात नमूद आहे. :-

"Out of 29 States, 14 States have been released **total central share** under the scheme on submission of complete proposals by the State Governments. The remaining 15 States have been released **partial central share or no central share** based on the submission of requisite documents by the respective State Government."

**१५.३** वारंवार स्मरणपत्रे देऊनसुद्धा अनेक राज्यांनी याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव सादर केले नाही आणि त्यामुळे आता १ जुलै २०१८ पासून ही योजना बंद करण्यात येत आहे असेही केंद्रशासनाच्या या उत्तरामध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"The Scheme makes it obligatory on part of the State Governments to implement the Scheme in totality so as to enable the Central Government to reimburse the central share. The Central Government, from time to time, had asked the State Governments to submit complete proposals for reimbursement of central share. **However, several State Governments have not submitted complete proposals for reimbursement of central share even after a lapse of more than eight years of the scheme, despite several reminders. Therefore, the Central Government has decided to close the scheme for reimbursement of central share for** implementation of revised pay scales (6th CPC) for teachers in State Universities and colleges to State Governments **from 01.07.2018."**

**१५.४** सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्र शासनातर्फे परतावा अनुदान राज्यांना देण्याची योजना १ जुलै २०१८ रोजी बंद करण्यात आली. आता सातव्या वेतन आयोगाच्या वेळीची विद्यमान परतावा अनुदान योजना लवकरच बंद केली जाईल असे स्पष्टपणे दिसून येत आहे. तशा तारखा केंद्र शासनातर्फे राज्यशासनाला कळविल्या जात आहेत. 'एआयसीटीई' ने केंद्र शासनाच्या अनुमतीने १ मार्च २०१९ च्या भारत शासन राजपत्रामध्ये 'रेग्युलेशन्स' प्रख्यापित केलेले आहेत. त्यातील परिच्छेद २.११ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"For this, State/UT Governments shall submit the claim to the Central Government. **All such claims must be submitted to the Central Government by the state/ UT on or before 31.03.2020. No claim of the State/UT Government shall be considered for financial assistance after 31.03.2020."**

**१६.** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची व्यवस्था लागू करतांना थकबाकी अदा करण्याची कार्यरिती कशी असेल याची तपशीलवार माहिती ३० जानेवारी २०१९ च्या शासकीय अधिसूचनेच्या परिच्छेद १४ मध्ये नमूद आहे. सर्व सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी (सेवानिवृत्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक धरून) सातव्या वेतन आयोगातील निवृत्ती वेतन व्यवस्था लागू करीत असतांना थकबाकी कशारितीने अदा केली जाईल? याची तपशीलवार कार्यरिती २४ जानेवारी २०१९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद आहे. मात्र विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी सातव्या वेतन आयोगाची व्यवस्था लागू करतांना "वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**" असा स्वयंस्पष्ट निर्णय महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतल्यानंतरसुद्धा ८ मार्च २०१९ च्या शासननिर्णयामध्ये त्याबाबतचा एका शब्दानेही उल्लेख असू नये, या मागचे कारस्थान महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राच्या लक्षात येणार नाही असे नोकरशाहीने गृहीत धरलेले आहे. **१२०० ते १३०० कोटी रूपयांची केंद्र शासनाची मदत महाराष्ट्राला नाही मिळाली तरी चालेल पण या वर्गाला थकबाकी अदा करायची नाही असे या**

**उभयपक्षी चर्चा होऊन बैठकीच्या कार्यवृत्तासह मार्ग न निघाल्यास महासंघाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलाविण्यात येईल व त्या बैठकीत संघर्ष (न्यायालयीन संघर्षासह) तीव्र करण्याच्या मार्गाचा विचार करण्यात येईल व त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.**

( महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २१ एप्रिल २०१९ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद १६ (१०) पहा. )

**कारस्थानाचे स्वरूप असून त्याचा तीव्र धिक्कार करण्यात येत आहे.** भारतीय घटनेतील तरतुदी, तद्नुसार करण्यात आलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यातील तरतुदी व त्या कायद्यांतर्गत तरतुदींचा वापर करून **केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीने विद्यापीठ अनुदान आयोगाने 'भारत शासन राजपत्रा'मध्ये प्रख्यापित केलेले 'रेग्युलेशन्स' हे कस्पटासमान समजण्याच्या नोकरशाहीच्या वृत्तीची तीव्र निर्भत्सना करण्यात येत आहे.** मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी केंद्राकडून अर्थसहाय्य मिळविण्याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे सादर करण्याचे मुदतबंद आश्वासन या महासंघाला लिखित स्वरूपात दिलेले असतांना व **मा.मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाशी सुसंगत अशा मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाविषयी कमालीची तुच्छतेची भावना मनात बाळगणाऱ्या नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा तीव्र निषेध करण्यात येत असून** आज रविवार, दिनांक २१ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे आंदोलनाचा निर्णय घेण्यात येत आहे :-

(१) हा ठराव संमत झाल्याच्या पुढील आठवड्यात राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना महासंघाचे अध्यक्ष व सचिव पत्राद्वारे ठरावाची प्रत सादर करतील. दिनांक १ मे २०१९ ते २० मे २०१९ या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेल्या सर्व विद्यापीठस्तरीय संघटना आपआपल्या मुखपत्राचा **"आंदोलन विशेषांक" प्रकाशित करतील.** या विशेषांकामध्ये रविवार, दिनांक २१ एप्रिल २०१९ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने संमत केलेला आंदोलनाचा ठराव व तो ठराव राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना सादर करणारे पत्र शब्दशः प्रकाशित करण्यात येईल. त्याच विशेषांकात जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय मेळाव्यांचा कार्यक्रम प्रकाशित करण्यात येईल. या अंकात प्रसिद्ध करावयाचा आंदोलन विषयक इतर मजकूर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या किंवा त्या त्या विद्यापीठस्तरीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

(२) दिनांक २० मे २०१९ ते ३० जून २०१९ या कालखंडात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या जिल्हा मेळाव्यांचे आयोजन केले जाईल. अ.न. जिल्ह्याचे नाव, मेळाव्याचे ठिकाण, मेळाव्याचा दिवस, दिनांक व वेळ यांचा समावेश असलेला महाराष्ट्रातील या सर्व जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम हा आंदोलन विशेषांकामध्ये प्रकाशित केल्याप्रमाणे असेल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील.

(३) दिनांक १० जून २०१९ ते ३० जून २०१९ या कालखंडामध्ये जिल्हास्तरीय नेते आपापल्या जिल्ह्यामध्ये आंदोलनाच्या प्रचारासाठी दौरे करतील.

(४) **सोमवार, दिनांक १७ जून २०१९** रोजी घटक संघटनांतर्फे त्या त्या **विद्यापीठाच्या मुख्यालयासमोर** धरणे आंदोलन आयोजित केले जाईल. विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंना निवेदन व आंदोलन विशेषांक सादर केला जाईल. विद्यापीठांवर आलेल्या या घटनात्मक संकटाच्या प्रसंगी त्यांनी मौन न पाळता निश्चित व उघड भूमिका घेऊन नोकरशाहीचा प्रयत्न हाणून पाडावा अशी त्यांना विनंती केली जाईल.

(५) **सोमवार, दिनांक २४ जून २०१९ रोजी उच्च शिक्षण संचालक पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चाचे व निदर्शनांचे आयोजन करण्यात येईल.** शासन निर्णयाने त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यात त्यांना आलेल्या अपयशाचा निषेध करणे हा या मोर्चाचा उद्देश असेल. दिनांक ८ मार्च २०१९ रोजी शासननिर्णय निर्गमित झालेला असतांना व मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी तसे आदेश दिलेले असतांना थकबाकी अदा करण्याबाबतचे प्रस्ताव अजूनही का सादर झालेले नाहीत याबाबत त्यांना विचारणा करण्यात येईल. केंद्राकडे प्रस्ताव सादर करण्याबाबतचे मुदतबंद आश्वासन मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिलेले असतांना याबाबत मा.मंत्रिमहोदयांच्या निदेशांची अवहेलना होण्याची कारणे काय आहेत? याबाबत चर्चेसाठी वेळ मागितली जाईल.

(६) सोमवार, **दिनांक १ जुलै २०१९ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी १२ ते ४ वाजेपावेतो राज्यस्तरीय धरणे आंदोलन** आयोजित केले जाईल.पूर्व सूचनेने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी वेळ ठरवून त्यांना मंत्रालयात भेटून संघटनेचे पदाधिकारी आंदोलनाचा ठराव व विशेषांक पुन्हा सादर करतील. त्यांनी वेळ न दिल्यास, मा. उच्च शिक्षण राज्यमंत्री यांना भेटून किंवा त्यांनीही वेळ न दिल्यास उभय मंत्र्यांच्या कार्यालयात आंदोलनाचा ठराव व विशेषांक सपत्र सादर केला जाईल. त्याच दिवशी राज्याचे मा. मुख्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून ठरावाची प्रत सादर करण्यात येईल.

(७) **राज्यस्तरीय धरणे आंदोलनाच्या दिवसापर्यंत** किंवा तत्पूर्वी मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी चर्चेसाठी वेळ न दिल्यास व उभयपक्षी चर्चेतून मार्ग न निघाल्यास मंगळवार, दिनांक २ जुलै २०१९ पासून महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक, राज्य **मंत्रीमंडळातील कोणत्याही मा.मंत्रिमहोदयांनी जिल्ह्याच्या ठिकाणी सार्वजनिक समारंभात/कार्यक्रमात सहभाग घेतला असेल तर त्या समारंभ स्थळी/कार्यक्रम स्थळी नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा धिक्कार म्हणून व अशा मनोवृत्तीला आवर घालण्यास शासनाला आलेल्या अपयशाच्या विरोधात महासंघातर्फे तीव्र निदर्शने केली जातील.**

(८) **सोमवार, दिनांक २२ जुलै २०१९ रोजी नवी दिल्ली येथे 'धरणे आंदोलन' आयोजित करण्यात येईल.** त्यादिवशी मोर्चाने देशाचे मा.मानव संसाधन मंत्री यांना निवेदन सादर करण्यात येईल. भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टातील केंद्रसूचीमध्ये ६६ व्या क्रमांकाच्या विषयाने केंद्र शासनाला प्राप्त झालेले अधिकार, त्या अधिकारांचा वापर करून केंद्र शासनाने केलेला १९५६ चा विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा, त्या कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करून भारत शासन राजपत्रामध्ये प्रख्यापित करण्यात आलेले 'रेग्युलेशन्स' पायदळी तुडविणाऱ्या उघडउघड घटनाबाह्य अपकृत्त्याची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येईल. त्याच बरोबर केंद्र शासनातर्फे जे परतावा अनुदान राज्यांना दिले जाते त्याबाबतच्या अटींचा काळजीपूर्वक अभ्यास करूनच याबाबतचा प्रस्ताव राज्यशासनाने सादर करावा असे केंद्राने राज्याला कळविण्याविषयी केंद्रशासनाला विनंती करण्यात येईल.

(९) **संपर्क पंधरवाडा** : बुधवार, दिनांक ३ जुलै २०१९ ते बुधवार, दिनांक १७ जुलै २०१९ या १५ दिवसात संपर्क पंधरवाडा आयोजित करण्यात येईल. या कालखंडात (१) राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय पदाधिकारी त्या त्या स्तरावरील वृत्तपत्रे व दुरदर्शनच्या कार्यालयात वेळ निश्चित ठरवून जातील व त्या माध्यमांच्या जबाबदार व्यक्तिंना आपली बाजू समजावून सांगतील. असे करतांना या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती माध्यमांच्या सुपूर्त करतील. (२) याच कालखंडात विद्यार्थी व पालकांच्या सभांचे आयोजन करुन सर्व कागदपत्रासह आपली बाजू संघटनांचे प्रतिनिधी समजावून सांगतील.

(१०) उभयपक्षी चर्चा होऊन बैठकीच्या कार्यवृत्तासह मार्ग न निघाल्यास महासंघाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलाविण्यात येईल व त्या बैठकीत संघर्ष (न्यायालयीन संघर्षासह) तीव्र करण्याच्या मार्गाचा विचार करण्यात येईल व त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *अध्यक्ष*

**(डॉ. एस. पी. लवांदे)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 03.05.2019) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.05.2019**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,.........................................................................

...........................................................................

...........................................................................

...........................................................................